| MHSN060014102015 | R.C.S. 700217/2015<br>Pandurang Shankar Chougule etc. 2 Vs.<br>Hanif Nijam Nadaf etc. 3 |
| --- | --- |

## निशाणी ५४ वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचे अर्ज वादी यांनी निशाणी ५३ कडील अर्जावर झालेल्या कॉस्टची रक्कमेबाबत पुर्नविचार करणेत यावा याकरीता दाखल केला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, दिनांक १५.१०.२०२२ रोजी वादी यांचे मिरज येथील वास्तव्यास असलेले व मयत झालेल्या चुलत भावाचे उत्तरकार्य असलेने माहितगार वादी हे तिकडे गेले असलेने याकामी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल करता येत नसलेचा अर्ज निशाणी ५३ कडे सादर केला होता. त्यावर मा. न्यायालयाने रक्कम रुपये २०००/– एवढी कॉस्टची रक्कम भरणेबाबत आदेश केला आहे. वादी हे शेतकरी असून त्यांचा शेती हाच एकमेव व्यवसाय आहे व याखेरील वादी यांचे अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही व सद्याची शेतक–यांची दयनीय स्थीती पाहाता अशा परिस्थीतीत वादींना कॉस्टची रक्कम भरणे हे सर्वथा अशक्य झाले आहे. वादी हे न्याय हक्काबाबत न्याय मागणेसाठी आले असलेने निशाणी ५३ कडे झालेल्या कॉस्ट भरणेच्या आदेशाचा पुर्नविचार करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादी नं. २ ते ४ तर्फे वादीच्या अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, वादीचा अर्ज व त्यातील मजकूर खोटा, चुकीचा असून तो प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. अर्ज कोणत्या तरतुदीखाली आहे व कायद्याप्रमाणे आहे हे अर्जात नमूद नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादी नं. १ यांनी वादी यांच्या अर्जास निशाणी ५५ कडे म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, वादीचा अर्ज खोटा असलेने तो या प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. वादीने ब–याच मुदती दिल्या तरीही वादींनी पुर्तता केलेली नाही. त्यामुळे निशाणी ५३ कडे जो आदेश केला आहे तो बरोबर आहे. वादी हे अशा प्रकारचा अर्ज देऊन पुन्हा वेळकाढूपणा करीत आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०४.** वादीचा अर्ज, त्यावरील म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा हा वाद मुद्दे काढून चौकशीसाठी लागला आहे. वादीने सदर अर्जात नमूद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. वादीचे वर्तन बघता वादी जाणुनबुजुन प्रकरण चालविण्याचे टाळत असल्याचे दिसते. अशा परिस्थीतीत अर्जात नमूद कारणांमध्ये सकृतदर्शनी तथ्य नसून अपवादात्मक कारण असल्याचे दिसत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात येतो.

RANJANA VIJAY KAMBLE
Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2025.02.11 17:30:57 +0530

ठिकाण –मिरज. (श्रीमती आर. व्ही. कांबळे)
दिनांक –११.०२.२०२५. दुसरे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

-

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist.Sangli. |
| Date of decision / typed | :- | 11.02.2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 11.02.2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 11.02.2025 |